Estd.1962
NAAC 'A' Grade

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103

**संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/254** **दि. 24.04.2020**

# परिपत्रक

विषयः– मार्च/एप्रिल, 2020 मधील उन्हाळी सत्रातील परीक्षेसंदर्भात.

सदर्भः 1. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/110, दि. 03.02.2020 चे परिपत्रक.
2. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/236, दि. 16.03.2020 चे परिपत्रक.
3. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/241, दि. 27.03.2020 चे परिपत्रक.
4. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/251, दि. 07.04.2020 चे परिपत्रक.
5. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/चव्हाण/253, दि. 13.04.2020 चे परिपत्रक.
6. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे जा. क्रं. F.1-1/2020(SECY), दि.17 एप्रिल, 2020 चे पत्र.

महोदय,

राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड–19) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठामार्फत मार्च/एप्रिल, 2020 मध्ये घेण्यात येणा–या सर्व मौखिक/प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा स्थगित करण्यात आलेल्या असून शिवाजी विद्यापीठामार्फत घेण्यात येणा–या सर्व मौखिक/प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या तारखा नंतर जाहिर करणेत येवून सर्व परीक्षांच्या फेरनियोजनाबाबतचा तपशील व स्वतंत्र वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करणेत येईल. असे सर्वांना कळविणेत आले आहे.

तथापि, विद्यापीठाच्या परीक्षेसंदर्भात विविध प्रसार माध्यमातून काही बातम्या प्रसारित होत असल्याने विद्यार्थ्यामध्ये संभ्रमावस्था निर्माण होत आहे. सदर संभ्रमावस्था टाळण्यासाठी सर्व संबंधीतांना पुनःश्च एकदा कळविणेत येते की, मार्च/एप्रिल 2020 मधील उन्हाळी सत्रातील परीक्षेसंदर्भात करावयाची कार्यवाही निश्चित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उपरोक्त संदर्भ क्रं. 6 च्या पत्रानुसार गठीत तज्ञ समितीच्या निर्देशानुसार व महाराष्ट्र शासनाने गठीत केलेल्या 6 सदस्यीय समितीच्या अहवालानुसार व तदनंतर प्राप्त होणा–या शासनाच्या निर्देशानुसार परीक्षेसंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल व त्याची अधिकृत माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणावे.

सही/–

(श्री. गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :–**
1) मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख
सर्व सलंग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था / अधिविभाग
2) मा. कुलगुरू कार्यालय
3) मा. प्र– कुलगुरू कार्यालय
4) मा. कुलसचिव कार्यालय